# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक १ जुलै, २०२५

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक** : **प्रश्नोत्तरे**

**दोन** : **म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास)**

**तीन** : **लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

(१) **श्रीमती चित्रा वाघ**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अहिल्यानगर महानगरपालिकेतील पाणीपुरवठा, मोटार वाहन, विद्युत, इ. विभागामध्ये विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून नियुक्त करण्यात आलेले अनेक अभियंते व कर्मचारी गेल्या १० वर्षांपासून मानधन तत्वावर कार्यरत असणे, महानगरपालिकेच्या या विभागांचा अत्यावश्यक सेवेमध्ये समावेश होत असल्याने मानधन तत्वावर अभियंते व कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीमुळे अत्यावश्यक सेवेच्या व्यवस्थापनावर त्याचा विपरित परिणाम होत असल्याची बाब निदर्शनास येणे, यापूर्वी नवी मुंबई तसेच परभणी महानगरपालिकेने देखील त्यांच्या आस्थापनेवर मानधन तत्वावर नियुक्त कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या सेवेत कायम केलेले असणे, त्याचधर्तीवर अहिल्यानगर महानगरपालिकेत मानधनावर कार्यरत अभियंते व कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या सेवेत कायम स्वरूपी सामावून घेण्याबाबत महासभेने प्रस्ताव क्र.४३, दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ रोजी मंजूर करून नगरविकास विभागाकडे मान्यतेकरिता पाठविण्यात आलेला असणे, परंतू अद्यापि जवळपास २ वर्षे होऊनही सदरहू प्रस्तावावर शासन स्तरावरून कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, या प्रकरणी कार्यवाहीस होत असलेल्या विलंबामुळे महानगरपालिकेच्या अत्यावश्यक सेवेच्या व्यवस्थापनावर विपरित परिणाम होत असून गेल्या १० वर्षांपासून मानधनावर कार्यरत असलेले अभियंते व कर्मचारी यांच्यात नैराश्याची भावना निर्माण होऊन असंतोष निर्माण होणे, मानधनावर कार्यरत अभियंते व कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केल्यास अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजात सुसुत्रता निर्माण होऊन, प्रशासनाच्या कार्यपध्दतीत गतिमानता निर्माण होण्याची शक्यता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

(२) **डॉ.प्रज्ञा सातव, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मृद व जलसंधारण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्य शासनाकडून जलयुक्त शिवार आणि जलसंधारणाची कामे करण्यासाठी मृद व जलसंधारण विभागाची सन २०१७ मध्ये निर्मिती करण्यात येणे, या विभागाला कृषी विभागाकडील सुमारे ९ हजार कर्मचारी देण्यास तत्कालीन शासनाने मान्यता देणे, आता कृषी विभागाचा सुधारीत आकृतीबंध तयार करुन केवळ दोन हजार कर्मचारी मृद व जलसंधारण विभागास देण्यास मान्यता देणे, वास्तविक या विभागाला ९ हजारांपेक्षा अधिक कर्मचाऱ्यांची गरज असतानाही केवळ २ हजार कर्मचारी देऊन या विभागाची बोळवण करण्यात येणार असल्याचे चित्र दिसत असणे, वास्तविक जलयुक्त शिवार ही शासनाची महत्वाकांक्षी योजना असतानाही त्यास कर्मचारी देण्यास शासन करीत असलेले दुर्लक्ष परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री सुनिल शिंदे,** प्रसाद लाड, प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री विक्रम काळे, अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती चित्रा वाघ, डॉ.परिणय फुके, सर्वश्री सदाशिव खोत, ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश टिळेकर, संजय केणेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुण्यातील इंद्रायणी नदीवरील कुंडमळा येथील लोखंडी पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेत चार जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून पन्नासहून अधिक पर्यटक जखमी झाले असल्याची हृदयद्रावक घटना दिनांक १५ जून, २०२५ रोजी घडली असणे, पर्यटकांचा अतिउत्साह आणि प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष याची परिणीती सदरहू दुर्घटनेत झाली असणे, कुंडमळा परिसरात पावसाळ्यात फुलून जाणाऱ्या निसर्गाच्या सान्निध्यात पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी हजारो आबालवृद्धांची दर वर्षी गर्दी होणे, नदीच्या दोन्ही तीरांवरील गावांतील लोकांसाठी तीस-पस्तीस वर्षापूर्वी सदरहू लोखंडी पूल बांधण्यात येणे, घटनेच्या दिवशी या भागात लोकांची उडालेली झुंबड, जीर्ण झालेल्या या पुलावर क्षमतेपेक्षा अधिक गर्दी झाल्याने पूल कोसळल्याचे सांगण्यात येणे, सदरहू पूल धोकादायक झाल्याने नवा पूल उभारण्याची स्थानिक नागरिकांकडून सातत्याने होत असलेली मागणी, बऱ्याच तक्रारी-पाठपुराव्यानंतर शासनाने गेल्या वर्षी पूलासाठी मंजूर केलेला निधी, मात्र प्रत्यक्ष कार्यादेश निघण्यास दीड वर्षाचा झालेला विलंब, सरकारी यंत्रणांनी आठ कोटी रुपयांचा नवा पूल उभारण्यासाठी केलेला लालफितशाही कारभार नागरिकांच्या जीवावर बेतला असल्याने राज्यभरातील जनतेत उमटलेली संतापाची लाट, यास्तव सदरहू दुर्घटनेतील

मृतांच्या व जखमींच्या नातेवाईकांना तातडीने भरीव आर्थिक मदत देण्यासह सदरहू ठिकाणी नवीन पूल उभारण्याच्या कामात अक्षम्य दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

(४) **श्री.संदीप जोशी**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"माहे जून, २०२५ च्या पहिल्या आठवड्यामध्ये अन्न व औषध प्रशासन विभागाने केलेल्या तपासणीत झेप्टोच्या मुंबईतील विविध डार्क स्टोअर्स (गोडाऊन) आणि वितरण केंद्रामध्ये काही अत्यंत धक्कादायक आणि आरोग्यास हानिकारक त्रुटी उघडकीस येणे, कालबाह्य अन्नपदार्थांचा साठा सापडला असून काही ठिकाणी वापरण्याची मुदत संपलेले खाद्यपदार्थ वितरणासाठी तयार करण्यात येत असल्याचेही निदर्शनास येणे, सदरहू खाद्यपदार्थावरील उत्पादन दिनांक/ उपयोगाच्या मुदतीबाबत चुकीची व भ्रामक माहिती देण्यात आली असणे, तर काही वस्तूंवर अन्न सुरक्षा मानांकनच (FSSAI नंबर) नसलेले उत्पादन वितरणात असणे, याच वितरण केंद्रामध्ये उंदीर, कीटक, डास इत्यादी अस्वच्छतेची परिस्थिती आढळून येणे, दूध, दुग्धजन्य पदार्थ, मांस इत्यादी शीत साखळीतील वस्तू खोलगट व असुरक्षित तापमानात साठविल्या जात असणे, या गंभीर त्रुटी केवळ एका कंपनीपुरत्या मर्यादित नसून झेप्टो, स्विगी, झोमॅटो यांसारख्या सर्वच डिलिव्हरी प्लॅटफॉर्मवर हा धोका लागू असल्याची शक्यता असणे, या कंपन्यांवर लाखो नागरिक अवलंबून असून वृद्ध, लहान मुले, शाळकरी विद्यार्थी, कर्मचारीवर्ग आणि आजारी रुग्ण देखील येथूनच खाद्यपदार्थ मागवित असणे, शासनाने तात्काळ या प्रकरणी सखोल चौकशी करुन राज्यातील सर्वच डिलिव्हरी प्लॅटफॉर्मच्या डार्क स्टोअर्स (गोडाऊन) आणि वितरण केंद्रामध्ये तपासणी करण्याची आवश्यकता, तसेच राज्यात डार्क स्टोअर्स अन्नसुरक्षा धोरण लागू करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री.शशिकांत शिंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील विविध विभागांमध्ये तांत्रिक व अतांत्रिक स्वरुपांच्या कामांसाठी कंत्राटी पद्धतीने मनुष्यबळ नियुक्त करणे, या मनुष्यबळाचा कार्यक्षम वापर न होणे, अत्यल्प दराने ठेका दिला जात असणे, परिणामी कामगारांना किमान वेतनही न मिळणे, फक्त खर्च कपात व मनुष्यबळ संख्येतील मर्यादा पाहता भविष्यात प्रशासकीय अडचणी निर्माण होण्याची शक्यता, तसेच परराज्यातील मजूर घेण्यात येणे, परिणामी स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध न होणे, याकरिता शासकीय विभागांसाठी कंत्राटी मनुष्यबळ व्यवस्थापनाची

अप्रकाशित प्रत

एक आदर्श व पारदर्शक कार्यपध्दती तयार करण्याची आवश्यकता, त्याचबरोबर कोयना जल विद्युत प्रकल्प वसाहत, अलोरे येथे पाणीपुरवठा जलनि:स्सारण व मलनि:स्सारण सुस्थितीत ठेवण्याकरिता निधीची तरतूद करणे, निर्लेखित वाहनांच्या जागी नवीन वाहने व रुग्णवाहिका खरेदीसाठी अतिरिक्त अनुदान देणे, यांत्रिकी संघटनेला स्थापत्य विभागाकडून पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्याने त्याचा परिणाम कामावर होणे, मातीकाम, कालवा, स्वच्छता कामाकरिता यंत्रसामुग्री उपलब्ध न होणे, प्रचलनासाठी इंधनाचा निधी उपलब्ध न होणे, पावसाळ्यात यंत्रसामुग्री बंद आल्यामुळे कामगारांना वेतन न मिळणे, शासकिय निवासस्थानी अनुज्ञप्ती शुल्क वसूली, सन २०१९ च्या परिपत्रकानुसार वेतन अदा करण्याची कार्यपध्दती प्रभावीपणे राबविणे आदि बाबींसंदर्भात शासन स्तरावर गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**चार : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

## - मध्यंतर -

**पाच : शासकीय विधेयके –**

**पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** "सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७ – महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग विधेयक, २०२५."

**(२)** "सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८ – महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग विधेयक, २०२५."

---

**सहा : सर्वश्री प्रविण दरेकर,** डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री अमोल मिटकरी, प्रसाद लाड, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री विक्रम काळे, श्रीकांत भारतीय, कृपाल तुमाने, संजय खोडके, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री किशोर दराडे, इद्रिस नायकवडी, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, पंकज भुजबळ, डॉ.परिणय फुके, सर्वश्री हेमंत पाटील, किरण सरनाईक, राजहंस सिंह, रणजितसिंह मोहिते-पाटील, दादाराव केचे, सदाशिव खोत, संजय केणेकर, अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, वसंत खंडेलवाल, विक्रांत पाटील, संदीप जोशी, योगेश टिळेकर, धर्मगुरु राठोड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"राज्यातील मुंबई, एमएमआरडीए, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर इ. महसुली जिल्हे व्यापारदृष्ट्या एकमेकांशी जोडलेले असणे, मुंबई तर देशाची ग्रोथ

अप्रकाशित प्रत

इंजिन असणे, मुंबई आणि जेएनपीटी पोर्टनंतर वाढवण बंदर राज्याला आर्थिक महासत्ता बनविण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरणार असणे, याठिकाणी नव्या विमानतळाची उभारणी करण्याबरोबरच नवी मुंबई, नैनाच्या माध्यमातून तिसरी आणि वाढवण बंदर प्रकल्पाच्या ठिकाणी चौथी मुंबई वसविण्याचे प्रस्तावित असणे, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे स्थानकही या बंदराजवळ प्रस्तावित असणे, वाढवण बंदरामुळे दरवर्षी २९८ दशलक्ष मेट्रीक टन मालाची हाताळणी करणे शक्य असणे, महाराष्ट्रासह देशाच्या विकासात हे बंदर 'गेमचेंजर' ठरणार असणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करुन वेगळी विकास नियंत्रण नियमावली तातडीने तयार करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेचे चतुर्थ श्रेणी कामगार तसेच गिरणी कामगार यांच्या घरांचा प्रश्न तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील कुर्ला येथील नेहरुनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुनर्विकास होऊन १० ते १५ वर्षे उलटल्यानंतरही त्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाले नसल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई उपनगरातील जुन्या व अत्यंत मोडकळीस आलेल्या भाडेकरूंच्या इमारतींना महापालिकेने नोटीस दिल्यानंतर व महापालिकेने किंवा घरमालकाने तोडल्यानंतर १५-१५ वर्षे त्या तशाच अवस्थेत पडून असल्याचे निदर्शनास येणे, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर यासारख्या मोठया शहरांच्या मेगापॉलीस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ही महानगरे जागतिक पटलावर उच्च दर्जाची व्हावी ही शासनाची महत्वांकाक्षा असणे, मुंबईसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात ६४,७८३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असणे, "ग्रोथ हब" संकल्पनेद्वारे मुंबई महानगर प्रदेशात ७ जागतिक व्यापार केंद्रे विकसित करण्याची योजना असणे, "वेव्हज" परिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि देशभरातील माध्यमे आणि मनोरंजन क्षेत्राला ग्लोबल प्लॅटफॉर्म प्राप्त होण्यासोबतच मुंबई जागतिक माध्यम-मनोरंजन उद्योगाची राजधानी म्हणून विकसित व्हावी हा शासनाचा निर्धार असणे, यामध्ये मेट्रो जाळयाचा विस्तार, रस्ते विकास व वाहतुक सुविधांचा समावेश असणे, मुंबई, पुणे आणि नागपूर मध्ये १४३.५७ कि.मी. चे मेट्रोमार्ग कार्यरत असणे, नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर (इनोव्हेशन सिटी) उभारण्यात येणार असणे, पुणे शहरात पीएमआरडीएच्या माध्यमातून रिंगरोड तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे जिल्हयातील हवेली तालुक्याच्या विभाजनाच्या प्रलंबित प्रस्तावावर विचार करण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाडयांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, नाशिक शहरात पंतप्रधान आवास योजना गतीमान करण्याची आवश्यकता, नाशिक मधील गावठाण भागात असलेली छोटी शहरे विकसित करण्याची व तेथील घरांचा क्लस्टर विकास करण्याची आवश्यकता, मुंबई, नागपूर व पुणे महानगरातील नागरिकांना पर्यावरणपूरक, शाश्वत, विनाअडथळा व वातानुकुलीत वाहतुक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी एकूण १४३.५७ कि.मी. लांबीचे मेट्रो मार्ग कार्यान्वित करण्यात आले असणे, ठाणे वर्तुळाकार मेट्रो मार्ग तसेच पुण्यातील स्वारगेट ते कात्रज विस्तार मार्गिका प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिली असणे, पुणे मेट्रो रेल्वे टप्पा-२ अंतर्गत खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी आणि नळ स्टॉप-वारजे-

अग्रिम प्रत

माणिक बाग या दोन मार्गिकांचा ९,८९७ कोटी रुपये किंमतीचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला असणे, मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या मेट्रो मार्गाचे काम दृष्टीक्षेपात असणे, नवी मुंबईतील उलवे येथे १,१६० हेक्टर क्षेत्रामध्ये नव्याने विकसित होत असलेल्या नवी मुंबई आंतराराष्ट्रीय विमानतळाचे काम ८५ टक्के पूर्ण झालेले असणे, गडचिरोली हा विकसित जिल्हा बनला असून त्याठिकाणी खनिज संपत्तीचा योग्य वापर करण्यात येऊन 'गडचिरोली स्टील सिटी' हा महत्वाकांक्षी प्रकल्प तेथे साकारण्याचे प्रयोजन असणे जेणेकरुन त्या भागात मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती होऊ शकेल, मुंबई-नागपूर समृध्दी द्रुतगती मार्ग गोंदिया आणि गडचिरोलीला जोडण्याचे प्रस्तावित असणे, नागपूरच्या भोसले राजघराण्यातील राजे रघुजी भोसले यांची तलवार लंडनहून आपल्या राज्यात परत आणण्यात राज्य शासनाला मिळालेले ऐतिहासिक यश, राज्यात एआय पॉलिसी, एआय विद्यापीठ, सायबर सिक्युरिटी इ. धोरणांची अंमलबजावणी करण्यात राज्य अग्रेसर असणे, महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेला भविष्यातील विकासासाठी जोडण्याचा या शासनाचा प्रयत्न असून सुखी, संपन्न, समृध्द, प्रगत, पुरोगामी सुधारणावादी महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि महाराष्ट्राला अधिकाधिक समृध्दीकडे नेण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सात : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

**(१) श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, सदाशिव खोत, वि.प.स.**

"**राज्यातील शाळांमधील पटसंख्या घटली असल्याबाबत**" या विषयावरील **डॉ. प्रज्ञा सातव व इतर वि.प.स.** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक **१५०४** ला दिनांक १३ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(२) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, वि.प.स.**

"**ग्रामविकास विभागातील कनिष्ठ सहाय्यक या पदावर पदोन्नती देण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या अधिसूचनेच्या अंमलबजावणीबाबत**" या विषयावरील डॉ. परिणय फुके व इतर वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक **८९८** ला दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ३० जून, २०२५

**जितेंद्र भोळे**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानपरिषद

अप्रकाशित प्रत